# जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद

## (उपचिटणीस शाखा)

दुरध्वनी क्रमांक 02472-227301 Email ID- rdc1osmanabad@gmail.com

वाचा- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.

2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.

3. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 30, 33, 34, 41 व कलम 51.

4. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 13.08.2020.

---

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर- 26
दिनांकः- 17 /08/2020.

**आदेश:-**

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 2 चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. 3 नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

त्याअर्थी मी दिपा मुधोळ-मुंडे, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद संदर्भ क्र. 2 व 3 अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारांनुसार उस्मानाबाद जिल्ह्यातील करोना विषाणु (COVID-19) चा प्रादुर्भाव रोखण्याकरिता प्रतिबंधात्मक उपाययोजना प्रभाविपणे राबविण्याचे अनुषंगाने जिल्हा शासकीय रुग्णालय (District Covid Hospital - DCH) मधील कोविड-19 च्या उपाययोजनांचे पर्यवेक्षण व समन्वय करण्यासाठी संदर्भ क्र. 4 अन्वये नियुक्त केलेले अधिकारी यांना सहाय्य करण्यासाठी तसेच जिल्हा कोविड रुग्णालयातील व्यवस्थापनाचे कामकाजाचे अनुषंगाने खालील नमूद अधिकारी यांची नियुक्ती करीत आहे.

| अ.क्र. | अधिकारी यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| 1. | डॉ. श्री. आर. बी. जोशी (मो. 9890402578) | प्रकल्प व्यवस्थापक, स्पर्श ग्रामीण रुग्णालय, सास्तूर ता. लोहारा |

वरिलप्रमाणे नियुक्त पर्यवेक्षण अधिकारी यांनी खालीलप्रमाणे कामकाज करावे.

1. जिल्हा कोविड रुग्णालय (District Covid Hospital - DCH) येथे कोविड-19 चे अनुषंगाने देण्यात येत असलेले उपचार व सेवासुविधांबाबत पर्यवेक्षण करणेसाठी संदर्भ क्र. 4 अन्वये नियुक्त केलेले पर्यवेक्षण अधिकारी यांना नेमून देण्यात आलेल्या कामकाजात सहाय्य करणे.
2. जिल्हा कोविड रुग्णालय (District Covid Hospital - DCH) येथील व्यवस्थापनासाठी आवश्यक असणारी कार्यवाही करुन त्याबाबतचे अभिलेख आवश्यक असलेल्या विविध नमुन्यातील रजिस्टर्स मध्ये तयार करणे.
3. जिल्हा कोविड रुग्णालय (District Covid Hospital - DCH) येथील व्यवस्थापमध्ये सुधारणा करण्यासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांबाबत लेखी अहवाल सादर करणे व त्यानुसार सुधारणा करणे.



Scanned by CamScanner

4. जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांनी तसेच जिल्हा रुग्णालय, उस्मानाबाद येथील कामकाजाकरिता नियुक्त केलेले नियंत्रण अधिकारी यांनी तसेच वरिष्ठांनी वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करणे.
5. वरिलप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अपर जिल्हाधिकारी उस्मानाबाद तथा नियंत्रण व समन्वय अधिकारी, जिल्हा रुग्णालय, उस्मानाबाद यांना जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद येथे सादर करणे.

सदर आदेशाची अंमलबजावणी आदेशाच्या दिनांकापासून तात्काळ लागू करण्यात येत आहे.

(दिपा मुधोळ-मुंडे)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

**प्रत:- माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी**

1. उपसंचालक, आरोग्य सेवा लातूर.
2. अपर जिल्हाधिकारी, उस्मानाबाद.
3. उपजिल्हाधिकारी (रोहयो), जि.का. उस्मानाबाद.
4. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, उस्मानाबाद.
5. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि. प. उस्मानाबाद.
6. अध्यक्ष, NIMA, उस्मानाबाद.
7. सर्व संबंधितांस अनुपालनास्तव.

17/8/20
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD

Scanned by CamScanner